CMYK

राष्ट्रीय एकता दिन २०२५: पंतप्रधान मोदी सरदार पटेलांसमोर नतमस्तक; देशाच्या एकतेचे रक्षण करण्याची केली प्रतिज्ञा >> पान 2

सारखं माफ, सारखं फुकट, आम्हाला निवडून यायचं होतं म्हणून आम्ही बोललो; कर्जमाफीवरून अजितदादा पुन्हा बोलले! >> पान 3

खड्ड्यांवर मुरुम, अपघातांना आळा आमदार सिद्धार्थ खरात यांचा 'एक कॉल प्रॉब्लेम सॉल'! >> पान 4

**सुविचार**

मेहनत ही यशाची गुरुकिल्ली आहे.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 89 ■ शनिवार, दि. 01 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



मिथुनची सून मदालसाने सोडली साऊथ इंडस्ट्री आतील पान

# जिल्हा व्यवसाय सुधारणेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना जादा अधिकार देण्यात येणार : मुख्यमंत्री फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात उद्योग विभागाचा आढावा

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात 'जिल्हा व्यवसाय सुधारणा कृती योजना २०२५' राबविण्यात येत आहे. १५४ सुधारणांचा समावेश असलेल्या या उपक्रमाची अंमलबजावणी १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत केली जाणार आहे. यात राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांसाठी 'चिंतन शिबिर' आणि विभागीय बैठकांचे आयोजन करण्यात येणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याधिकाऱ्यांना अधिक अधिकार प्रदान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी 'इज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तर दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी ६ विभागीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून, त्या ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी आपले अहवाल सादर करतील. यातील नाशिक विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' सुधारणा समिती कार्यरत आहे, तर विजय सूर्यवंशी (कोकण विभाग) आणि जितेंद्र पापळकर (छत्रपती संभाजीनगर विभाग) अनुक्रमे औद्योगिक संसाधन वापर आणि भू-बँक प्रोत्साहन या विषयांवर लक्ष केंद्रित करत आहेत.

बैठकीदरम्यान राज्यातील 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' प्रगती, अंमलबजावणी केलेल्या सुधारणा तसेच आगामी उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. महाराष्ट्राने 'ईज ऑफ डुईंग बिझनेस २०२४' मूल्यांकनात लक्षणीय प्रगती साधली असून ४०२ पैकी ३९९ सुधारणा पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळे राज्याचा अंमलबजावणी स्कोअर ९९.२५ टक्क्यांवर पोहोचला आहे. महाराष्ट्राला यापूर्वी 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' २०२०-२१' मध्ये अचिव्हर आणि 'ईओडीबी२०२२' मध्ये टॉप अचिव्हर म्हणून गौरविण्यात आले होते. 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस २०२४' चा अंतिम निकाल ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर होणार आहे.'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' अंतर्गत भूखंड आणि बांधकाम परवाने, कामगार सुधारणा, उपयुक्तता आणि तपासणी प्रणाली तसेच नियामक सुलभीकरण ही प्रमुख लक्ष्यकेंद्रीत क्षेत्रे आहेत. त्याचबरोबर मैत्री २.० द्वारे संपूर्ण एकल-खिडकी परिसंस्था कार्यान्वित करण्याची योजना आहे. त्याचबरोबर सिंगल साइन-ऑन, परवान्यांची स्थिती, सामान्य अर्ज फॉर्म, एकत्रित पेमेंट, डॅशबोर्ड्स, तपासणी, तक्रार निवारण आणि वापरकर्ता अभिप्राय यासारखे आवश्यक मॉड्यूल्स मैत्री २.० मध्ये समाविष्ट असणार आहेत.

महाराष्ट्रात व्यवसाय सुलभता, नियमनमुक्ती आणि क्षेत्रीय मंजुरी सुलभीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली जात आहेत. उद्योगांना अधिक अनुकूल आणि पारदर्शक वातावरण मिळावे यासाठी प्रमुख सुधारणा करण्यात येत आहेत.

केंद्र सरकारच्या औद्योगिक आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (डीपीआयआयटी) च्या 'बिझनेस रिफॉर्म अ‍ॅक्शन प्लॅन' (बीआरएपी) नुसार, २०१५ पासून महाराष्ट्र सातत्याने देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यांपैकी एक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना राजभवनात अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आज राजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी सरदार पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली, तसेच राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त उपस्थित कर्मचारी व अधिकारी यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली.भारताच्या दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या ४१ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहण्यात आली. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी ही राष्ट्रीय संकल्प दिवस म्हणून पाळली जाते. यावेळी राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे तसेच राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## रशियाने युक्रेनच्या पॉवर ग्रीडवर डागले ६५० ड्रोन, कडक हिवाळ्यात देशभरातील वीजपुरवठा खंडित

कीव : रशियाने पुन्हा एकदा युक्रेनच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर (पॉवर ग्रीड) मोठ्या प्रमाणात ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. या हल्ल्यांमुळे संपूर्ण युक्रेनमध्ये वीजपुरवठा खंडित झाला. अधिकाऱ्यांच्या मते, युक्रेनच्या वीज पुरवठ्यात व्यत्यय आल्यानं संपूर्ण देश अंधारात बुडाला. गेल्या तीन वर्षात रशियानं युक्रेनवर केलेल्या सर्वात मोठ्या हल्ल्यांपैकी हा एक आहे. रशियन सैन्याच्या हल्ल्यांमुळे युक्रेनमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. युक्रेनच्या पंतप्रधानांनी रशियाच्या या हल्ल्याचं ''पद्धतशीर ऊर्जा दहशत'' असं वर्णन केलं आहे. या हल्ल्यांमध्ये किमान ६ जण ठार झाले आणि अनेकजण जखमी झाल्याची माहिती आहे.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात राष्ट्रीय एकता दिनाची शपथ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचे पहिले उपपंतप्रधान, गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात मुख्य सचिव राजेश कुमार यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार करून अभिवादन केले. तसेच, दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त (राष्ट्रीय संकल्प दिन) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.भारतीय एकात्मतेसाठी निश्चयपूर्वक धोरण आखून त्यासाठी पावले उचलणाऱ्या सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येत असलेल्या राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी यांना मुख्य सचिवांनी शपथ दिली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, अवर सचिव गोविंद साबणे, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, श्री. उतेकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## मतदार यादीतील घोळावर ठाकरे बंधू कोर्टात जाण्याच्या तयारीत

### ठोस पुरावे न्यायालयासमोर मांडले जाणार; येत्या दोन दिवसांत निर्णय

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** एकीकडे मतदारयाद्यांतील घोळावर मनसे आणि विरोधी पक्षांकडून मोर्चा काढण्यात येत असून दुसरीकडे कायदेशीर लढा लढण्यासाठीही पावले उचलली जात असल्याचं दिसतंय. निवडणूक आयोगाच्या विरोधात ठाकरे बंधू कोर्टात जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. येत्या दोन दिवसात त्यासंबंधी याचिका दाखल करण्यात येणार असून मतदार यादीमधील दोष पुराव्यासह कोर्टात सादर करणार असल्याची माहिती आहे.

मतदार यादीतील घोळासंबंधी विरोधी पक्षाचे नेते कायदे तज्ज्ञांची भेट घेणार असून विविध पर्यायांची चाचपणी करण्यात येणार असल्याची माहिती आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या बैठकीतही त्यवर चर्चा झाली असून कोर्टात जाण्यासह निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या पर्यायावरही चर्चा झाल्याची माहिती आहे.

मोर्चात सहभागी होणाऱ्या पक्षांनी मोर्चाची जोरदार वातावरणनिर्मिती केल्याचं दिसतंय. त्याचाच एक भाग म्हणून राज ठाकरेंनी गुरुवारी मुंबईत मनसे पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. यावेळी त्यांनी निवडणूक आयोग आणि केंद्र तसंच राज्य सरकारवर जोरदार तोफ डागली. हा मोर्चा दणदणीत झाला पाहिजे, असं सांगतानाच आपण स्वतः लोकलनं मोर्चासाठी जाणार असल्याचं ठाकरे म्हणाले. मतदारयाद्या स्वच्छ केल्यानंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, त्याला आणखी वर्ष लागलं तरी हरकत नाही, असं त्यांचं म्हणणं आहे.

दरम्यान, सत्याच्या मोर्चाला काँग्रेसकडून मोजक्याच नेत्यांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. महाविकास आघाडी, मनसे आणि इतर विरोधी पक्षाच्या सत्याच्या मोर्चाला काँग्रेसकडून बाळासाहेब थोरात आणि विजय वडेट्टीवार हे काँग्रेसचे राज्यातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

## सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन

**जालना/प्रतिनिधी :** भारताचे पहिले उपपंतप्रधान, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आणि देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात प्र.अपर जिल्हाधिकारी सरिता सुत्रावे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तर सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरी करण्यात असल्याने प्र. निवासी जिल्हाधिकारी मनिषा दांडगे यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिव्यांगांसाठी ४ टक्के आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी होणार – सचिव तुकाराम मुंढे

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ आणि त्याअंतर्गत नियम २०१७ नुसार राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय आस्थापनांना त्यांच्या कार्यालयातील दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती विहित नमुन्यात नोंदविणे आवश्यक आहे. राज्य शासनातील सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालये, विभाग प्रमुख तसेच स्वायत्त संस्थांनी आपल्या विभागातील दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती दरवर्षी १ जानेवारी रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे दिव्यांग व्यक्तींना शासन सेवेत व पदोन्नतीमध्ये असलेल्या ४ टक्के आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी होणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, या निर्णयाचा उद्देश शासन सेवेमध्ये कार्यरत असलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांची पारदर्शक व अचूक नोंद ठेवणे आणि दिव्यांगांसाठी असलेल्या ४ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी प्रभावीपणे राबविणे हा आहे. या निर्णयामुळे राज्य शासनातील विविध विभागांमधील दिव्यांग कर्मचाऱ्यांची माहिती एकाच स्वरूपात उपलब्ध होणार असून, दिव्यांगांच्या हक्कांचे रक्षण आणि सक्षमीकरणाच्या प्रयत्नांना अधिक गती मिळणार आहे.

या निर्णयानुसार सर्व प्रशासकीय विभाग व सर्व विभाग प्रमुख दिव्यांगांसाठी असलेल्या रिक्त पदांचा सहामाही आढावा घेतील. त्यामुळे अनुशेष पदे तत्काळ भरली जातील. सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी तयार केलेली माहिती दरवर्षी १ जानेवारी रोजी सर्व विभाग आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना सादर करतील आणि आयुक्त, दिव्यांग कल्याण हे सर्व विभागांकडील माहिती एकत्र करून वार्षिक अहवालात विभागनिहाय समाविष्ट करतील. जो विभाग निर्धारित नमुन्यानुसार माहिती सादर करणार नाही त्या विभागांविरुद्ध कलम ८९ नुसार दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे सचिव श्री. मुंढे यांनी सांगितले.

याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**आता आपणही महागाईच्या विरोधात उपवासाची सवय करून घेतली पाहिजे!!**




# जायकवाडीसह मराठवाड्यातील प्रमुख धरणे १००% तुडुंब

## अवकाळी पावसामुळे पाणीसाठा ९७ टक्क्यांवर!

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर: परतीच्या पावसानंतरही हवामानातील अनपेक्षित बदलामुळे सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे जायकवाडी सह मराठवाड्यातील बहुतेक सर्व प्रमुख धरणे १०० टक्के भरली आहेत. परिणामी विभागातील पिण्यासह सिंचनाचा प्रश्न मिटला असून, समाधान व्यक्त होत आहे. यंदा मान्सूनच्या चार महिने पावसाने दमदार साथ दिली. अनेक भागात मुसळधार पाऊस कोसळला तर अतिवृष्टीने मोठे नुकसान केले. नद्या नाले दुथडी भरून वाहू लागले. शेतीपिकांसह घरे, गायगोठ्यांचेही नासधूस झाली.**

एकीकडे असे नुकसान झालेले असताना असताना दुसरीकडे विभागातील धरणांमध्ये भरमसाठ पाणीसाठा जमा झाला. जायकवाडीसह विभागातील प्रमुख ११ धरणे तुडुंब भरली. यात जायकवाडी सह अनेक धरणामधून विसर्ग करण्यात आला. जायकवाडीतुन यंदा चार ते पाच वेळा विसर्ग करण्यात आला आहे. दरम्यान, सप्टेंबरमध्ये पावसाळा संपला.

ऑक्टोबरमध्ये परतीच्या पावसाला सुरुवात झाली. मात्र दोन आठवडे कोरडे गेल्यानंतर, चक्रीवादळे आणि हवामानातील अनपेक्षित बदलांमुळे अवकाळी पावसाला सुरुवात झाली. ते सत्र अद्याप सुरूच आहे. या पावसामुळे धरणांमध्ये पुन्हा आवक सुरु झाल्याने बुधवार, २९ ऑक्टोबरपर्यंत प्रमुख ११ पैकी ९ धरणे १०० टक्के भरली आहेत. तर सिद्धेश्र्वर धरण ९८ टक्क्यांवर आहे. याशिवाय निम्न दुधना ७५ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. परिणामी जायकवाडीसह अनेक धरणांमधून निसर्गाला सुरुवात करण्यात आली आहे. आजघडीला विभागातील प्रमुख



११ धरणांमध्ये एकूण ९७. ०६ टक्के पाणीसाठा जमा झालेला आहे.

यंदा जूनपासून आजतागायत झालेला पाऊस पाहता मराठवाड्यात ३८ टक्के अधिकच पाऊस झाला आहे. १ जून ते २९ ऑक्टोबरपर्यंत विभागाची सरासरी ७४६. २ मिमी इतकी आहे. तर झालेला पाऊस हा १०२९, ७ मिमी आहे. म्हणजेच एकूण १३८ टक्के पाऊस झाला आहे. हा सरासरीच्या ३८ टक्के अधिक आहे. मागील वर्षी १८. ९ टक्के अधिक पाऊस झाला होता हे विशेष. या पाणीसाठ्यामुळे भविष्यातील पिण्याची, सिंचनाची आणि उद्योगांसाठीच्या पाण्याची चिंता मिटली आहे. हवामानातील बदल पाहता नोव्हेंबरपर्यंत हा अवकाळी पाऊस बरसण्याची शक्यता हवामान अभ्यासकांनी वर्तवलेली आहे.

CMYK

>> पान २

## निसर्गाचा लहरीपणा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढत चालला आहे. निसर्गाच्या लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. आताही पहा ना नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी पावसाने विश्रांती घेतली नाही. नोव्हेंबर महिन्यातही राज्यातील अनेक भागात पाऊस सुरू आहे. आंध्रप्रदेश आणि ओडिशाच्या समुद्र किनाऱ्यावर मोंथा नावाचे चक्रीवादळ धडकले आहे. या चक्रीवादळाने राज्यातच नाही तर देशात मुसळधार पावसाचा अदाज वर्तवला जात आहे. सहा महिने झाले तरी पाऊस थांबायचे नाव घेत नाही. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा नोव्हेंबर महिन्यात पूर्वी कडाक्याची थंडी पडत असे आता मात्र नोव्हेंबर महिना उजाडूनही थंडीचा साधा लवलेशही नाही. जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्र्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

# राष्ट्रीय एकता दिन २०२५: पंतप्रधान मोदी सरदार पटेलांसमोर नतमस्तक; देशाच्या एकतेचे रक्षण करण्याची केली प्रतिज्ञा

**एकता नगर/वृत्तसंस्था** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं त्यांना पुष्पांजली वाहिली. त्यांनी उपस्थितांना ''एकतेची शपथ'' दिली आणि राष्ट्रीय एकता दिवसाच्या परेडचे साक्षीदार बनले.

पंतप्रधान मोदींना अर्पण केली आदरांजली : गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकता नगरजवळील सरदार पटेल यांच्या १८२ मीटर उंच पुतळ्याजवळ पंतप्रधान मोदी सकाळी पोहोचले. यावेळी त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याला फुलांच्या पाकळ्या अर्पण करुन आदरांजली वाहिली. या कार्यक्रमात भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश होता. यात भारताच्या विविधतेतील एकतेचं दर्शन घडलं. २०१४ मध्ये मोदी पहिल्यांदा पंतप्रधान झाले, तेव्हापासून ३१ ऑक्टोबरला





सरदार पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस (राष्ट्रीय एकता दिन) म्हणून साजरी केली जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतली एकता जपण्याची शपथ : या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान मोदींनी देशाची एकता आणि अखंडता जपण्याची शपथ घेतली. उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले, ''मी आपल्या देशाची एकता आणि अखंडता जपण्यासाठी ही शपथ घेत आहे. या कार्यासाठी स्वत:ला समर्पित करतो. मी राष्ट्रीय एकतेच्या भावनेनं ही प्रतिज्ञा घेतो आणि अंतर्गत सुरक्षा राखण्यासाठी स्वत:ला वचनबद्ध करतो. एकता प्रतिज्ञा, भारताची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्यासाठी स्वत:ला समर्पित करण्याचा एक गंभीर संकल्प आहे.''

परेडमध्ये खास आकर्षण : या उत्सवाचं प्रमुख आकर्षण असलेल्या राष्ट्रीय एकता दिवस परेडमध्ये बीएसएफ आणि सीआरपीएफ सारख्या निमलष्करी दलांचं आणि विविध राज्य पोलीस दलांची पथकं सहभागी झाली. यावर्षी, प्रजासत्ताक दिनाच्या परेडच्या धर्तीवर ही परेड आयोजित करण्यात आल्यामुळं हा कार्यक्रम आणखी खास बनला आहे.

एकसंध, मजबूत आणि स्वावलंबी भारताचं स्वप्न कायम ठेवतो : ''सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भारत त्यांना आदरांजली वाहतो. भारताच्या एकात्मतेमागील ते प्रेरक शक्ती होते, अशा प्रकारे त्यांनी आपल्या देशाचं भवितव्य त्याच्या सुरुवातीच्या काळात घडवले. राष्ट्रीय अखंडता, सुशासन आणि सार्वजनिक सेवेसाठी त्यांची अढळ वचनबद्धता पिढ्यांना प्रेरणा देत राहते. एकसंध, मजबूत आणि स्वावलंबी भारताचे त्यांचे स्वप्न कायम ठेवण्याचा आमचा सामूहिक संकल्प आम्ही पुन्हा एकदा मांडतो,'' अशी भावना नरेंद्र मोदी यांनी एक्सवर पोस्ट करत व्यक्त केली.

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी क्रीडा प्रबोधिनी स्थापन करणार : आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : आदिवासी विद्यार्थ्यांमधील सुप्त क्रीडा गुण विकसित होण्यासाठी ६०० विद्यार्थी क्षमतेची क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्यात येईल, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी येथे केले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांच्या हस्ते आज सकाळी स्व. मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलात एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे उदघाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार नितीन पवार, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड, अपर आयुक्त गोपीचंद कदम, दिनकर पावरा, प्रकल्प अधिकारी नरेश अकुनूरी (कळवण), अर्पिता ठुबे (नाशिक) उपस्थित होते. मंत्री डॉ. वुईके यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. उदघाटन सत्रानंतर विविध क्रीडा प्रकारांना सुरूवात झाली.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके म्हणाले की, आदिवासी विद्यार्थी कल्पक आणि गुणवान आहेत. राज्यात ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल सुरू आहेत. तेथे ११ हजार ३०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून या स्पर्धा दरवर्षी आयोजित केल्या जातात. त्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विद्यार्थ्यांमधून खेळाडू घडण्यास मदत होणार आहे.


आदिवासी विकास विभागाने विद्यार्थी केंद्रबिंदू मानून गुणवंत विद्यार्थी घडवावेत. या स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी विजय किंवा पराभव न मानता खिलाडू वृत्ती दाखवावी. त्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच या विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा देत त्यांच्यातील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करोवत, असेही त्यांनी आवाहन केले. यावेळी खासदार डॉ. बच्छाव यांनी मार्गदर्शन केले. आदिवासी विकास आयुक्त श्रीमती बनसोड यांनी प्रास्ताविकात या स्पर्धांची माहिती दिली.

दोन हजारांवर विद्यार्थ्यांचा सहभाग

महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटीच्या राज्यात ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल आहेत. तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धा होतात. तीन दिवस या स्पर्धा सुरू राहतील. या स्पर्धेत दोन हजार ७०४ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. त्यात एक हजार ४२७ मुलांचा, तर एक हजार २७७ मुलींचा समावेश आहे. या स्पर्धा वैयक्तिक आणि सांघिक अशा दोन्ही प्रकारात खेळविण्यात येणार आहेत. वैयक्तिक प्रकारात तिरंदाजी, ॲथलेटिक्स, बॅडमिन्टन, बॉक्सिंग, बुद्धिबळ, जिम्नॅस्टिक्स, ज्यूदो, टेनिस, शूटिंग, पोहणे, टेबल- टेनिस, तायक्वांदो, वेटलिफ्टिंग, कुस्ती (फ्री स्टाइल), योगा आदी १५ प्रकारात, तर सांघिक प्रकारात बास्केट बॉल, फुटबॉल, हॅण्डबॉल, हॉकी, कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल आदी सात खेळांचा समावेश आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी १ नोव्हेंबर रोजी छत्तीसगडला भेट देणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : पंतप्रधान नरेंद्र मोदी १ नोव्हेंबर रोजी छत्तीसगडला भेट देणार आहेत. सकाळी सुमारे १० वाजता, 'दिल की बात' कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, ते नवा रायपूर अटल नगर येथील श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयात आयोजित 'जीवनदान' समारंभात जन्मजात हृदयरोगावर यशस्वीरित्या उपचार घेतलेल्या २५०० बालकांशी संवाद साधतील.



त्यानंतर, ते १०:४५ च्या सुमाराला, ब्रम्हाकुमारींच्या ''शांती शिखर'' या आध्यात्मिक अध्ययन, शांतता आणि ध्यानधारणेच्या आधुनिक केंद्राचे उद्घाटन करतील.

त्यानंतर, ११:४५ च्या सुमाराला पंतप्रधान नवा रायपूर अटल नगर येथील छत्तीसगड विधानसभेच्या नवीन इमारतीत भारतरत्न माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याचे अनावरण करतील. त्यानंतर ते छत्तीसगड विधानसभेच्या नवीन इमारतीला भेट देतील आणि त्याचे उद्घाटन करतील. हरित इमारत संकल्पनेवर बांधण्यात आलेली ही इमारत पूर्णपणे सौर ऊर्जेवर चालणारी आणि पावसाच्या पाण्याची साठवण करणाऱ्या यंत्रणेने सुसज्ज आहे. यावेळी ते उपस्थितांना संबोधित करतील.

दुपारी १:३० च्या सुमाराला, पंतप्रधान शहीद वीर नारायण सिंह स्मारक आणि आदिवासी स्वातंर्त्य सैनिक संग्रहालयाचे उद्घाटन करतील आणि त्याची पाहणी करतील. हे संग्रहालय राज्यातील आदिवासी समुदायांचे धैर्य, त्याग आणि देशभक्तीचा वारसा जतन करेल आणि प्रदर्शित करेल. पंतप्रधान यावेळी संग्रहालयाचे पोर्टल आणि स्वातंर्त्यसैनिकांचा सन्मान करणाऱ्या ''आदि शौर्य'' या ई-पुस्तकाचे प्रकाशन करतील तसेच स्मारकस्थळी शहीद वीर नारायण सिंह यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करतील.

त्यानंतर, दुपारी २:३० च्या सुमाराला पंतप्रधान छत्तीसगड राज्याच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित छत्तीसगड रजत महोत्सवात सहभागी होतील. पंतप्रधान रस्ते, उद्योग, आरोग्यसेवा आणि ऊर्जा यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश असलेल्या १४,२६० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विकास आणि परिवर्तनकारी प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील.

ग्रामीण रोजगारांमध्ये बळकटी आणण्यासाठी पंतप्रधान छत्तीसगडच्या ९ जिल्ह्यांमध्ये १२ नवे स्टार्ट अप ग्राम उद्योजकता कार्यक्रम ब्लॉक्सचे उद्घाटन करतील. बांधकाम पूर्ण झालेल्या ३.५१ लाख घरांच्या गृह प्रवेश कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी होतील आणि राज्यभरातील ग्रामीण कुटुंबांसाठी सन्मानपूर्ण निवास व्यवस्था तसेच सुरक्षितता सुनिश्चित करत, पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत ३ लाख लाभार्थ्यांना १२०० कोटी रुपयांचा हप्ता जारी करतील.

संपर्क जोडणी सुधारण्याच्या उद्देशाने पंतप्रधानांच्या हस्ते पाथलगाव-कुंकुरी ते छत्तीसगड-झारखंड सीमा या टप्प्यातील चौपदरी ग्रीनफिल्ड महामार्गाचा कोनशीला समारंभ होईल. भारतमाला परियोजनेअंतर्गत, सुमारे ३,१५० कोटी रुपये खर्चून भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे (एनएचएआय) हा टप्पा विकसित करण्यात येत आहे. कोरबा, रायगढ, जशपूर, रांची आणि जमशेदपूर या भागांतील महत्त्वाच्या कोळसा खाणी, औद्योगिक विभाग आणि पोलाद कारखाने यांना परस्परांशी जोडणारा हा धोरणात्मक मार्गिका टप्पा क्षेत्रीय व्यापारी संबंध अधिक बळकट करणारी आणि मध्य भारताला देशाच्या पूर्व भागाशी एकत्र करणारी मुख्य आर्थिक धमनी म्हणून काम करेल.

त्यासोबतच, पंतप्रधान या दौऱ्यात बस्तर आणि नारायणपूर जिल्ह्यांच्या विविध भागांतून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग-१३०डी (नारायणपूर-कस्तूरमेटा-कुटूल-निलांगुर-महाराष्ट्र सीमा) चे बांधकाम तसेच अद्ययावतीकरण कार्याची पायाभरणी करतील. राष्ट्रीय महामार्ग एनएच-१३०सी (मदंगमुडा-देवभोग-ओदिशा सीमा) चे दुपदरी पेव्हड शोल्डर्स असलेल्या महामार्गाच्या उन्नतीकरण कार्याचे उद्धाटन देखील पंतप्रधानांच्या हस्ते केले जाईल. यामुळे जिल्ह्याच्या आदिवासी तसेच अंतर्गत भागामध्ये रस्त्यांची जोडणी लक्षणीयरित्या सुधारून आरोग्यसुविधा, शिक्षण आणि बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याची चांगली सोय होईल आणि दुर्गम भागातील सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळेल.

विद्युत क्षेत्रासाठी, पंतप्रधान आंतर-क्षेत्रीय ईआर-डब्ल्यू-आर परस्पर जोडणी प्रकल्पाचे उद्धाटन करतील. या प्रकल्पामुळे पश्चिम आणि पूर्व ग्रीड्स दरम्यान आंतर-क्षेत्रीय वीज हस्तांतरण क्षमता १,६०० मेगावॉटने वाढेल आणि त्यामुळे या भागात ग्रीडची विश्वासार्हता सुधारून निश्चित वीजपुरवठ्याची सुनिश्चिती होईल.

यासोबतच, पंतप्रधानांच्या हस्ते उर्जा क्षेत्रातील ३,७५० कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचे लोकार्पण, उद्धाटन आणि पायाभरणी होईल. छत्तीसगड राज्यातील उर्जाविषयक पायाभूत सुविधा बळकट करणे, वीजपुरवठ्याची विश्वासार्हता सुधारणे आणि पारेषण क्षमता सुधारणे हा या प्रकल्पांचा उद्देश आहे.

सुधारित वितरण क्षेत्र योजने (आरडीएसएस) अंतर्गत पंतप्रधान सुमारे १,८६० कोटी रुपयांच्या कामांचे लोकार्पण करतील. ग्रामीण तसेच कृषी क्षेत्राचा वीज पुरवठा सुधारण्यासाठी नव्या वीजवाहिन्यांची उभारणी, फीडर विभाजन, ट्रान्सफॉर्मर्स बसवणे,कंडक्टर्स चे रूपांतरण तसेच कमी दाबाच्या नेटवर्क्सचे बळकटीकरण इत्यादी कार्यांचा यात समावेश आहे. पंतप्रधान रायपुर, विलासपूर, दुर्ग, बेमेतारा, गरियाबंद आणि बस्तर यांसारख्या जिल्ह्यांमध्ये ४८० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या नव्या वीज उपकेंद्रांचे उद्घाटन देखील करतील.

या प्रकल्पामुळे १५ लाखाहून अधिक नागरिकांना फायदा होणार असून त्यांना स्थिर व्होल्टेज मिळेल, वीज पुरवठा खंडित होणे कमी होईल तसेच दुर्गम आणि आदिवासी भागातही विश्वासार्ह वीज पुरवठा होईल. याव्यतिरिक्त, १,४१५ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या नवीन सबस्टेशन आणि ट्रान्समिशन प्रकल्पांची पायाभरणी केली जाईल, यात कांकेर आणि बालोदाबाजार-भाटापारा येथील प्रमुख सुविधांसह, राज्यातील विविध जिल्ह्यात सुरू होणाऱ्या सुधारित वितरण क्षेत्र योजना (आर डी एस एस) कामांचा समावेश आहे ज्यामुळे वीज पुरवठ्याचा विस्तार आणि गुणवत्ता दोन्ही वाढतील.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्रात, पंतप्रधान रायपूर येथे एचपीसीएलच्या अत्याधुनिक पेट्रोलियम ऑइल डेपोचे उद्धाटन करतील, जो ४६० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चून बांधला गेला आहे आणि त्याची पेट्रोल, डिझेल आणि इथेनॉलसाठी साठवण क्षमता ५४,००० किलोलिटर इतकी आहे. ही सुविधा एक प्रमुख इंधन केंद्र म्हणून काम करेल, ही सुविधा छत्तीसगड आणि शेजारी राज्यांमध्ये अखंड इंधन पुरवठा सुनिश्चित करणारे एक प्रमुख इंधन केंद्र ठरेल. यामध्ये १०,००० किलोलिटर इथेनॉल साठवण असल्यामुळे हा डेपो इथेनॉल ब्लेंडिंग कार्यक्रमाला देखील चालना देईल, ज्यामुळे जीवाश्म इंधनवरील अवलंबित्व कमी होईल आणि स्वच्छ ऊर्जा विकासाला प्रोत्साहन मिळेल.

पंतप्रधान सुमारे १९५० कोटी रुपये खर्चून बांधलेल्या ४८९ किमी लांबीच्या नागपूर-झारसुगुडा नैसर्गिक वायू पाईपलाईनचे देखील लोकार्पण करतील. हा प्रकल्प भारताच्या ऊर्जा मिश्रणात नैसर्गिक वायूचा वाटा १५म पर्यंत वाढवण्याच्या दिशेने मोठे पाऊल असून ''एक राष्ट्र, एक गॅस ग्रिड'' या दृष्टिकोनाची पूर्तता करतो. ही पाईपलाईन छत्तीसगडमधील ११ जिल्ह्यांना राष्ट्रीय गॅस ग्रिडशी जोडेल, सोबतच औद्योगिक विकासाला चालना देईल तसेच या प्रदेशाला स्वच्छ आणि परवडणारे इंधन उपलब्ध करून देईल.

औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी, पंतप्रधान दोन स्मार्ट औद्योगिक क्षेत्रांची पायाभरणी करतील, त्यापैकी एक जांजगीर-चंपा जिल्ह्यातील सिलादेही-गटवा-बिरा येथे आणि दुसरे राजनांदगाव जिल्ह्यातील बिजलेटला येथे उभारण्यात येणार आहेत. याव्यतिरिक्त, पंतप्रधान नवा रायपूर अटल नगर येथील सेक्टर-२२ येथे फार्मास्युटिकल पार्कची पायाभरणी करतील. हे पार्क औषध आणि आरोग्य विषयक उत्पादनांसाठी समर्पित क्षेत्र म्हणून काम करेल.

आरोग्यसेवा क्षेत्राला चालना देण्यासाठी, पंतप्रधान मनेंद्रगड, कबीरधाम, जांजगीर-चंपा आणि गीदम (दंतेवाडा) येथे पाच नवीन सरकारी वैद्यकीय महाविद्यालये आणि बिलासपूर येथील सरकारी आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाची पायाभरणी करतील. या प्रकल्पांमुळे छत्तीसगडमध्ये वैद्यकीय शिक्षणाला बळ मिळेल, आरोग्य सेवा अधिक व्यापक होईल आणि पारंपरिक चिकित्सा पद्धतीला प्रोत्साहन मिळेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# सारखं माफ, सारखं फुकट, आम्हाला निवडून यायचं होतं म्हणून आम्ही बोललो; कर्जमाफीवरून अजितदादा पुन्हा बोलले!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून बच्चू कडू, राजू शेट्टींसह अत्यंत आक्रमक पवित्रा घेत महायुती सरकारला वायदा देण्यास भाग पाडलं. सरकारकडून पुढील सहा महिन्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी समिती गठित करण्यात आली आहे. दुसरीकडे, याच मुद्यावरून आता उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा बोलले आहेत. आज अजित पवार यांनी शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यानंतर तुम्ही कर्ज फेडा ना? असे म्हटले आहे. यापूर्वी कर्जमाफीवरून अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्यांवरून वाद निर्माण झाला आहे. त्यांना जाहीर सभांमधूनही कर्जमाफीवरून विचारणा झाली आहे.

**साहेबांनी एकदा कर्जमाफी दिली**

अजित पवार कर्जमाफीवरून म्हणाले की, शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यानंतर तुम्ही कर्ज फेडा ना? की सारखं माफ, सारखं फुकट, सारखं माफ, साहेबांनी एकदा कर्जमाफी दिली. आता आम्हाला निवडून यायचं होतं म्हणून आम्ही बोललो. त्यासाठी काही पैसे खर्च करावं लागतं ना? असे अजित पवार म्हणाले. दरम्यान, अजित पवार यांनी अतिवृष्टीच्या मदतीवरूनही भाष्य केले. ते म्हणाले की, अनेक ठिकाणी नुकसान झालं आहे. पंचनामे वाढत आहेत. ३२ हजार कोटींचा आकडा ४० हजार कोटींवर गेला आहे.

दरम्यान, कर्जमाफीवरून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला आहे. त्यांनी सहा महिन्यांच्या विलंबावरून सवाल केला आहे. उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे की, कर्जाच्या डोंगराखाली शेतकरी खचला आहे. निसर्ग कोपलाच आहे. त्यात संवेदना नसलेल्या सरकारचा तुघलकी कारभारः अशा अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा एकदा सरकारने लोणकढी थाप मारून वेळ काढायचा प्रयत्न केला आहे. कर्जमाफीसाठी आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांना जे आश्र्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे त्यातून पुढील प्रश्र्नांची उत्तरे मिळतील काय? शेतकऱ्यांची दैनावस्था समोर दिसत असताना तुमची परदेशी समिती नेमका कसला अभ्यास करून अहवाल देणार? पुढच्या वर्षी जूनमध्ये जर खरंच कर्जमाफी होणार असेल तर आत्ताच्या कर्जाचे हप्ते भरायचे का? पुढील वर्षी जुनच्या कर्जमाफीत है हप्ते माफ होणार असतील तर ते का भरायचे? ते न भरता शेतकऱ्यांना रब्बीसाठी कर्ज मिळणार आहे का? जर नव्याने कर्ज मिळणार असेल तर ते देखील माफ होणार का? या प्रश्र्नांची उत्तरे कोण देणार?

**आणखी 'योग्य वेळ' कोणती असू शकते?**

इतर मदत करण्याआधी खरडून गेलेली जमीन पूर्ववत करण्यासाठी शेतकरी माती मागतो आहे. पण त्याविषयी सरकार काहीच करायला तयार नाही. जगाचे पोट भरणारा शेतकरी आज भयंकर संकटात सापडला आहे. पाऊस अजूनही शेतकयांची पाठ सोडायला तयार



नाही. सरकाराचे हजारो कोटींच्या नुकसानभरपाईची घोषणा केली; पण शेतकऱ्यांच्या खात्यावर किती पैसे जमा झाले हा प्रश्र्नच आहे. महाराष्ट्रात सहा महिन्यांपासून पाऊस पडतो आहे. शेतकरी पूर्णपणे उद्धस्त झाला आहे. कर्जमुक्ती देण्याची यापेक्षा आणखी 'योग्य वेळ' कोणती असू शकते? तरीही योग्य वेळ आल्यावर कर्जमुक्ती देऊ असे सांगून सरकारने जो वेळकाढूपणा चालवला आहे, ती शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा आहे. मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातून सातत्याने शेतकरी आत्महत्यांच्या बातम्या येत आहेत. आत्महत्यांचे हे वाढते आकडे सरकारच्या कानावर आदळत नाहीत काय?

**मुहूर्त शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे**

तरीही सरकारने कर्जमुक्तीसाठी पुढच्या वर्षी जूनचा मुहूर्त काढावा, हे चीड आणणारे व शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे आहे. कर्जमुक्तीसाठी चालढकल करून हे सरकार शेतकऱ्यांना मृत्यूच्या दारात ढकलत आहे. जूनपर्यंत होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची जबाबदारी सरकार घेणार आहे काय? सरकार शेतकऱ्यांना केवळ खेळवत आहे. थोडक्यात शेतकऱ्याऱ्यांच्या आत्ताच्या हालअपेष्टा तशाच राहणार, पुढच्या जूनचा गुळ सरकारने शेतकऱ्यांच्या कोपराला लावला आहे. आत्ता आवाज करायचा नाही असेच बहुदा सरकारला सांगायचे असावे. शेतकयांना फसवण्याचचे हे खेळ बंद करा आणि अभूतपूर्व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न झुलवता तत्काळ कर्जमुक्त करा, असे आम्ही मायबाप सरकारला शेतकऱ्यांच्या वतीने हात जोडून सांगत आहोत!

## संक्षिप्त...

### राष्ट्रपतींनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांना वाहिली पुष्पांजली



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज (३१ ऑक्टोबर २०२५) राष्ट्रपती भवनात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दिडशेव्या जयंतीनिमित्त त्यांना पुष्पांजली वाहिली. तत्पूर्वी, त्यांनी नवी दिल्लीतील सरदार पटेल चौकात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याला आदरांजली वाहिली.

### राजधानीत सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाचे पहिले गृहमंत्री आणि लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आणि देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड यांनी कोपर्निकस मार्ग येथील महाराष्ट्र सदनात त्यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनिषा पिंगळे यांच्यासह महाराष्ट्र सदन व परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरी करण्यात येते. या निमित्ताने निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली. महाराष्ट्र सदनचे व्यवस्थापक प्रमोद कोलपत्ते यांनी इंदिरा गांधी व वल्लभ भाई पटेल यांच्या कार्याचा व जीवनप्रवासाचा परिचय उपस्थितांना करुन दिला.

### केरा व मणदुरे उपसासिंचन योजनेचा आराखडा तयार होतात प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल – पालकमंत्री शंभूराज देसाई

**सातारा/प्रतिनिधी :** केरा व मणदुरे भागातील अडीच हजार हेक्टर क्षेत्रावरील सिंचनासाठी सर्वेक्षण होणार आहे. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर आराखडा तयार होईल. यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.केरा, मणदुरे विभागातील निवकणे चिटेघर व बिबी या लघु प्रकल्पाच्या दोन्ही तीरावरील गावांना १०० मीटर उंचीपर्यंत शेतीसाठी उपसा सिंचनाद्वारे पाणी उचलून देण्याच्या सर्वेक्षण कामाचा शुभारंभ पालकमंत्री श्री. देसाई यांच्या हस्ते झाला. केरळ तालुका पाटण येथे झालेल्या कार्यक्रमास दादासाहेब जाधव, दादासाहेब पाटील, भरत पाटील, अभिजीत पाटील, एन डी पाटील यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.केर व मणदुरे या भागातील नागरिक पिढ्यानपिढ्या पाण्यापासून वंचित राहिले आहेत, असे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, या भागाला उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून १०० मीटर अंतर पाणी शासनामार्फत तारळी पॅटर्न प्रमाणे उपलब्ध करून दिले जाणार आहे. हे पाणी धरणातून व केरळा नदीच्या पात्रातून दोन्ही तीरावरील गावांना उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. केरा व मणदुरे या भागाला पाणी उपलब्ध व्हावे यासाठी विविध बैठका घेऊन शासनस्तरावर पाठपुरावा केला. उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळे या भागाचा कायापालट होणार आहे. पीक पद्धतीही बदल होणार आहे तसेच रोजगारासाठी होणारे स्थलांतरही थांबणार आहे. सर्वेक्षण करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहनही पालकमंत्री श्री. देसाई यांनी शुभारंभ प्रसंगी केला. या कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुंभमेळ्याची विकास कामे वेळेत पूर्ण होणार – विभागीय आयुक्त डॉ. गेडाम

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी आवश्यक पायाभूत सोयीसुविधा तयार करण्यात येत आहेत. त्यासाठी विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात देत असून कुंभमेळ्यासाठीची सर्व विकास कामे विहीत वेळेत पूर्ण होतील, अशी ग्वाही नाशिक– त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिली.विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांच्यासह प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आदींनी आज सकाळी पंचमुखी हनुमान मंदिर, दिगंबर आखाडा, लक्ष्मी नारायण मंदिर, तपोवन परिसराला भेट देत साधू – महंत यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम बोलत होते.

# राष्ट्रीय एकता दिनानिमित्त पदयात्रा

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** स्वातंर्त्य लढा व स्वातंर्त्यानंतर अखंड भारत निर्माणात सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या या दृढनिश्चय आणि समर्पित योगदानाचे स्मरण करीत आपण प्रत्येक जण देशाच्या एकात्मतेसाठी सदैव कटीबद्ध राहू या, असे आवाहन राज्याचे इतर मागासवर्ग बहुजन कल्याण, अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे यांनी आज येथे केले.

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्यावतीने एकता पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेचा समारोप शहागंज येथील उद्यानात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवार, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) आश्विनी लाठकर, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई तसेच अन्य अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते. पदयात्रा सकाळी ७.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयापासुन सुरु झाली. तेथून 'भारत माता की जय', 'सरदार वल्लभभाई पटेल अमर रहे', अशा घोषणा देत ही पदयात्रा जिल्हाधिकारी कार्यालय ते सरदार वल्लभभाई पटेल पुतळा, शहागंज येथे आली. तेथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

येथे उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. तसेच स्वदेशी वस्तू वापराबाबत शपथ देण्यात आली. यावेळी खा. डॉ. भागवत कराड यांनी सरदार पटेल यांच्या राष्ट्र उभारणीतील योगदानाची उपस्थितांना माहिती दिली.



१७. गुजरातमधील केवडिया येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त पुष्पांजली अर्पण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी.

# मिथुनची सून मदालसाने सोडली साऊथ इंडस्ट्री

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मिथुन चक्रवर्ती यांची सून मदालसा शर्मा हिने वयाच्या १६व्या वर्षी दक्षिण भारतीय इंडस्ट्रीमध्ये तिच्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. तथापि, ती लवकरच बॉलिवूडमध्ये दाखल झाली. अलिकडेच एका मुलाखतीत मदालसाने खुलासा केला की दक्षिण भारतीय इंडस्ट्रीमध्ये एका अस्वस्थ अनुभवामुळे तिला हा इंडस्ट्री सोडून बॉलिवूडमध्ये जावे लागले.पिंकव्हिलाला दिलेल्या नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत, मदालसा शर्माने दक्षिण भारतीय उद्योग सोडण्याबद्दल सांगितले की, ''मी फक्त १६ वर्षांची होते जेव्हा मी दक्षिण भारतीय उद्योगात काम करायला सुरुवात केली. हैदराबाद, चेन्नई, रामोजी फिल्म सिटी इत्यादी ठिकाणी राहून मला घराची आणि माझ्या पालकांची आठवण येत होती. म्हणून, मी विचार करू लागले की, मी मुंबईवर थोडे लक्ष केंद्रित करावे. मी दक्षिण भारतीय उद्योगाला इतकी वर्षे दिली आहेत, म्हणून कदाचित मुंबईला थोडा वेळ देण्याची वेळ आली आहे.''

''याशिवाय, काही अनुभव माझ्यासाठी थोडे वाईट होते. मला वाटले की कदाचित मी ते करू शकणार नाही, मी तो मार्ग स्वीकारू शकणार नाही. जेव्हा आपण कास्टिंग काउचसारख्या गोष्टींबद्दल बोलतो तेव्हा मला वाटते की ते प्रत्येक उद्योगात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे, मग ते चित्रपट असो, कॉर्पोरेट ऑफिस असो किंवा इतर कोणतेही क्षेत्र असो. प्रत्येक करिअरमध्ये, लोकांना कधीकधी अशा परिस्थितींचा सामना करावा लागतो. एका टप्प्यावर मी निराश झालो. संभाषणामुळे मला अस्वस्थ वाटले. कोणताही अनुभव नव्हता, परंतु त्या संभाषणामुळे मला खूप अस्वस्थ वाटले.''

मदालसा पुढे म्हणाली, ''मला ते संभाषण नेमके कशाबद्दल होते ते आठवत नाही. त्यावेळी मी फक्त १७ वर्षांची होते. मला खूप अस्वस्थ वाटत होते. मी उठून निघून गेले आणि स्वतःला म्हणालो, चला मुंबईला परत जाऊया. मग मी ठरवले की मी इथे काम करेन, फक्त तेच करेन जे मला खरोखर करायचे होते. पण त्यावेळी थोडी निराशा झाली आणि मी बॉलीवूडवर लक्ष केंद्रित करण्याचा आणि माझ्या कुटुंबाच्या जवळ राहण्याचा निर्णय घेतला.''

मदालसा शर्माने २००९ च्या तेलुगू चित्रपट फिटिंग मास्टर द्वारे तिच्या करिअरची सुरुवात केली. तिने कन्नड आणि तमिळ चित्रपटांमध्येही काम केले आहे. तिने सम्राट अँड कंपनी, दिल साला संकी, कार्तूट आणि द बंगाल फाइल्स सारख्या हिंदी चित्रपटांमध्येही काम केले आहे. तथापि, मदालसाला चित्रपटांपेक्षा अनुपमा या टीव्ही शोमुळे जास्त ओळख मिळाली.

### विधानपरिषद सभापती राम शिंदे यांचा सुधारित दौरा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे हे जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.शनिवार, १ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता जैनापूर, ता. शिरोळ येथे आगमन व आमदार राजेंद्र पाटीलऱ्यड्रावकर यांच्या निवासस्थानी राखीव. दुपारी १.३० वाजता जैनापूर येथून नरसोबाच्यावाडीकडे प्रयाण. दुपारी २ वाजता दत्त मंदिर, नरसोबाचीवाडी येथे आगमन व दर्शनासाठी राखीव. दुपारी २.४५ वाजता नरसोबाची वाडी येथून कोल्हापूरकडे प्रयाण. दुपारी ३.३० वाजता शासकीय विश्रामगृह, कोल्हापूर येथे आगमन व राखीव. सायं. ५.४५ वाजता शासकीय विश्राम गृह येथून हॉटेल सयाजीकडे प्रयाण. सायं. ६ वाजता हॉटेल सयाजी येथे आगमन व कोल्हापूर मेडीकल असोसिएशन, इंडियन मेडिकल असोसिएशन शाखा कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित वैद्यकीय परिषदेच्या उद्धाटन सोहळ्यास उपस्थिती.

# टिक्की-चाट, समोसा खाणे महागणार

## सरकारने लागू केला ३० टक्के कर, कधीपासून वाढणार खिशावर भार?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मुंबई असो कि दिल्ली किंवा इंदूर...देशातील अनेक शहरांमध्ये सायंकाळी रस्त्यावर चाटची दुकाने दिसतात. संध्याकाळी चाट खाणे अनेकजणांसाठी दररोजच्या नित्यक्रमाचा भाग आहे. मात्र, आता संध्याकाळची हीच सवय तुमचा खिशा रिकामा करण्याची शक्यता आहे. सरकारने याच चाट, समोसामध्ये वापरण्यात येणाऱ्या खास पदार्थावर आयात शुल्क लागू केले आहे. हे आयात शुल्क १ नोव्हेंबर पासून लागू होणार आहे. या खाद्यपदार्थाशिवाय चाट, समोसाला चव येत नाही. मात्र, हाच पदार्थ आता खिशावर भार आणणार असल्याचे म्हटले जात आहे.

सरकारने १ नोव्हेंबरपासून पिवळ्या वाटाण्यांच्या आयातीवर ३० टक्के शुल्क लादले आहे. मात्र, ३१ ऑक्टोबर किंवा त्यापूर्वीच्या बिल ऑफ लॅंडिंगसह शिपमेंट अजूनही शून्य शुल्काने आयात केले जातील, असे महसूल विभागाने म्हटले आहे. पिवळ्या वाटाण्यांवर यापूर्वी कोणतेही आयात शुल्क नव्हते. परंतु १ नोव्हेंबरपासून एकवेळ ३० टक्के कर लादल्याने त्यांच्या वापरावर आणि आयातीवर निश्चितच परिणाम होईल. व्यापारी जास्त किमतीत वाटाणे आयात करतात तेव्हा याचा त्यांच्या किरकोळ किमतींवर परिणाम होईल आणि शेवटी ग्राहकांपर्यंत पोहोचेल.

इतका मोठा कर का?

महसूल विभागाने सांगितले की जर १ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर बिल ऑफ लॅंडिंग जारी केले गेले तर पिवळ्या वाटाण्यांच्या आयातीवर १० टक्के मानक दराने आणि २० टक्के कृषी पायाभूत सुविधा आणि विकास उपकर आकारला



जाईल. या वर्षी मे महिन्यात सरकारने मार्च २०२६ पर्यंत पिवळ्या वाटाण्यांच्या आयातीवर शुल्कमुक्त आयात करण्यास परवानगी दिली होती. मात्र, फक्त पाच महिन्यांपूर्वी, हा निर्णय बदलण्यात आला आहे आणि ३० टक्के शुल्क लादण्यात आले आहे.

भारतात पिवळ्या वाटाण्यांचे किती उत्पादन?

भारतात पिवळ्या वाटाण्यांना डाळींचे पीक मानले जाते. त्यांच्या मर्यादित उत्पादनामुळे, त्यापैकी बहुतेक आयात करावे लागतात. गेल्या पाच ते सहा वर्षात डाळींच्या उत्पादनात काही वाढ झाली असली तरी, एकूण डाळींमध्ये त्यांचा वाटा खूपच मर्यादित आहे. २०२४ मध्ये देशात एकूण डाळींचे उत्पादन सुमारे २४.५ दशलक्ष टनाच्या आसपास होता. तर, पिवळ्या वाटाण्यांचे उत्पादन केवळ १.२ ते १.५ दशलक्ष टन होते. देशात एकूण डाळींचा वापर देखील २७ दशलक्ष टन आहे, ज्यासाठी दरवर्षी २.५ दशलक्ष टन डाळींची आयात करावी लागते.

किती वाटाणे आयात केले जातात?

भारत बहुतेक पिवळे वाटाणे कॅनडा आणि रशियामधून आयात करतो. देशात ते हरभराऐवजी वापरले जात असल्याने, शुल्कमुक्त आयातीला परवानगी देण्यात आली आहे. २०२३-२४ आर्थिक वर्षात, २० दशलक्ष टन पिवळे वाटाणे आयात करण्यात आले, जे गेल्या वर्षी ३ दशलक्ष टन होते. उत्पादनात पिवळ्या वाटाण्यांचा वाटा नगण्य असू शकतो, परंतु आयातीमध्ये त्यांचा वाटा सुमारे ३० टक्के आहे. जर सरकारने आता मोठे आयात शुल्क लादले तर वाटाण्याच्या किरकोळ किमती वाढतील.

# खड्ड्यांवर मुरूम, अपघातांना आळा आमदार सिद्धार्थ खरात यांचा 'एक कॉल प्रॉब्लेम सॉल'!

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**डोणगाव :** गोहगाव (ता. मेहकर) डोणगावगोहगाव मार्गावरील समृद्धी महामार्गाखालील रस्ता खड्ड्यांनी विद्रूप झाल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. दुचाकीस्वारांना खोल खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने अपघातांची मालिका सुरू झाली होती.

या गंभीर समस्येची माहिती उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे कार्यकर्ते राजूभाऊ गणपतराव दांदाडे (गोहगाव) यांनी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी आमदार सिद्धार्थ खरात यांना दूरध्वनीवरून दिली.

आमदार खरात यांनी नागरिकांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना थेट कॉल करून उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. परिणामी, दुसऱ्याच दिवशी म्हणजे ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी समृद्धी महामार्ग विभागाने घटनास्थळी हजर राहून खड्ड्यांवर मुरूम टाकण्याचे काम सुरू केले.






या तत्पर कार्यवाहीमुळे स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांनी आमदार सिद्धार्थ खरात यांच्या संवेदनशील व लोकाभिमुख भूमिकेचे कौतुक केले आहे.

''आमदार साहेबांच्या एका फोनवर काम सुरू झालं हीच खरी जनसेवा!'' असे मत स्थानिक वाहनचालकांनी व्यक्त केले.

## विविध वृत्त...

## शेख फयाज शेख रहेमत यांचे निधन

दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** ढाणकी येथील रहिवासी व सांज दैनिक ''यवतमाळ मार्मिक'' चे प्रतिनिधी शेख फयाज शेख रहेमत (वय ४२) यांचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.



शेख फयाज हे शांत, मनमिळाऊ आणि प्रामाणिक स्वभावाचे व्यक्ती होते. त्यांनी पत्रकारितेत सचोटीने काम करत स्थानिक प्रश्नांवर नेहमीच आवाज उठवला. त्यांच्या अचानक निधनाने ढाणकी परिसरासह पत्रकारितेच्या क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, वडील, एक मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो व दुःखी परिवाराला धैर्य लाभो, हीचच प्रार्थना.

## अकोला जिल्ह्यातील पीक विमा योजनेतील शेतकऱ्यांना विमा रकमेचे पैसे मिळाले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून खरीप हंगाम २०२४ मध्ये ९.४५ कोटी रूपये नुकसानभरपाई मिळाली आहे. शेतकरी ओळखपत्रानुसार कमीत कमी १००४ रूपये नुकसान भरपाई देण्यातआली. ५ ते २७ रूपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाल्याच्या बातम्या काही वृत्तपत्र, वृत्तवाहिन्यावर प्रसारित होत आहेत, त्या वस्तुस्थितीला धरून नसल्याचा खुलासा अकोला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी केला आहे.

अकोट तालुक्यातील कुटासा परिसरातील दिनोडा, म रोडा, कावसा व रेल या गावातील शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई म्हणून शेतकऱ्यांना १००० रूपयांपेक्षा कमी रक्कम दिलेली नाही. शेतकरी अरुण राऊत यांना ५ रुपये ८ पैसे व गणपत सांगळे यांना १३ रुपये विमा अदा केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. मात्र प्रत्यक्षात अरुण राऊत यांना ३८६७ रूपये आणि गणपत सांगळे यांना ३६३६ रूपये विमा रक्कम अदा केली आहे शिवाय संदीप घुगे, विजय केंद्रे, केशव केंद्रे, आदित्य मुरकुटे व उमेश कराड यांनी खरीप हंगाम सन२०२४ मध्ये पीक विमा योजनेमध्ये सहभाग नोंदवला नसल्याचा खुलासा विमा कंपनीने कळविल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले.

## आठ महिन्यानंतरची कर्जमाफी शेतकऱ्यांना कशी फायद्याची? बच्चू कडू यांनी उदाहरणासह सांगितलं

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात अतिवृष्टी झाल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची मागणी जोर धरु लागली. विरोधातील सर्वच राजकीय पक्षांनी ही मागणी केली होती, तसेच अतिवृष्टीची भरगोस मदतही शेतकऱ्यांना मिळावी, अशी मागणी होती. त्यातच, प्रहार संघटनेचे प्रमुख तथा माजी मंत्री बच्चू कडू यांनी शेतकरी प्रश्नावरुन सरकारविरुद्ध एल्गार पुकारला. महाएल्गार आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी सरकारला आपलं म्हणणं मान्य करण्यास भाग पाडलं. त्यानुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत जून २०२६ मध्ये कर्जमाफी करणार असल्याचं सरकारने मान्य केलं असून उच्चस्तरीय समिती देखील नेमण्यात येणार आहे. मात्र, ८ महिन्यानंतर कर्जमाफी का, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. त्यावर, ८ महिन्यानंतरची कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी कशी फायदेशीर आहे, हे बच्चू कडू यांनी उदाहरणासह स्पष्ट केलं आहे.



राज्यातील शेतकऱ्यांकडून आजच कर्जमाफीची घोषणा व्हावी, अशी मागणी केली जात आहे. मात्र, आज होणाऱ्या कर्जमाफीच्या तुलनेत आठ महिन्यानंतर होणारी कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी जास्त फायद्याची राहील असा दावा बच्चू कडू यांनी केला आहे. जर सरकारने कालपासूनच कर्जमाफी दिली असती, तर ३१ मार्च २०२५ पर्यंतचे शेतकऱ्यांचे थकीत कर्ज त्यात बसले असते. मात्र, आता ३१ मार्च २०२६ पर्यंत चे थकीत कर्ज त्यामध्ये बसतील. त्यामुळे, यंदाच्या अत्यंत जास्त अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचा या कर्जमाफीमुळे जास्त फायदा होईल आणि हेच त्या कर्जमाफीचे जास्त उल्लेखनीय यश असल्याचा दावा बच्चू कडू यांनी केला आहे.

**कर्जमाफीचे श्रेय सरकारलाच मिळणार**

सरकारच्या प्रतिनिधींसोबत काल अडीच तास जोरदार खडाजंगी झाली. सरकार आर्थिक कारण सांगून शेवटपर्यंत तारीख द्यायला तयार नव्हते. मात्र, आम्ही तारीख घेऊनच आलो, असा दावाही बच्चू कडू यांनी कालच्या बैठकी संदर्भात बोलताना केला. सर्वांची नाही मात्र गरीब शेतकऱ्यांची कर्जमाफी निश्रि्चत होईल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. ३० जून २०२६ पर्यंत होणाऱ्या या कर्जमाफी संदर्भात सरकारमधील तिघांना आम्ही श्रेय देतो. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी शब्द दिला होता. आता अजित पवार आणि आमचे देवा भाऊ यांनी मोठी मेहनत घेतली आहे. हा श्रेयाचा प्रश्र्नच नाही, हा राजकीय आशीर्वादाचा मुद्दा आहे. कर्जमाफी झाल्यानंतर श्रेय तर अखेरीस सरकारलाच मिळणार असल्याचे ही बच्चू कडू म्हणाले.

## केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांचा एकतेचा संदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** युवकांनी राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सक्रिय सहभागी व्हावे. सरदार पटेल यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन भारताच्या एकतेचा आणि स्वावलंबी भविष्यासाठीच्या संकल्पाचा संदेश आत्मसात करावा, असे प्रतिपादन केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले.

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे म्हणाल्या, पदयात्रेचे उद्दिष्ट तरुणांमध्ये राष्ट्रीय भावना, सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि एकतेचा संदेश पोहोचविणे हे असून, संपूर्ण राज्यात २५ नोव्हेंबरपर्यंत जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर दरम्यान गुजरातमधील करम सदपासून 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' केवडिया येथे राष्ट्रीय पदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. या पदयात्रेत उत्स्फुर्तने सहभागी होऊन सरदार पटेल यांच्या कार्य जनसामान्यपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन क्रीडा राज्यमंत्री यांनी केले.



सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ''सरदार ऽ१५० युनिटी मार्च'' अंतर्गत जिल्हास्तरीय पदयात्रेचे आयोजन जनता कला वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर येथे करण्यात आले होते. या पदयात्रेला केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे व आमदार चैनसुखी संचेती यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले.

या पदयात्रेत मलकापूरम धील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, युवक संघटना, स्वयंसेवक, एनएसएस, एनसीसी सदस्य, वारकरी मंडळी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पदयात्रेदरम्यान ''भारत म ाता की जय'', ''वंदे मातरम'' या घोषणांनी वातावरण देशभक्तीने भारून गेले. पदयात्रेचा समारोप मातृ मंडळ, चाळीस बिगा येथे झाला. या वेळी माजी मंत्री एकनाथ खडसे, जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवे उपस्थित होते. मुख्य कार्यक्रमाच्या प्रारंभी सरदार पटेल यांच्या जीवनावर आधारित पथनाट्य आणि देशभक्तिपर गीत सादर करण्यात आले.

## पवन ऊर्जा क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत महावितरणला 'विंड इंडिया-२०२५' पुरस्कार



**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांशी सुसंगत राहून महावितरणकडून अक्षय ऊर्जेला प्राधान्य देण्यात येत आहे. सन २०३० पर्यंतच्या दीर्घकालीन वीज खरेदी करारात पवन-सौर संकरित ऊर्जे चाही समावेश करण्यात आला आहे. त्याची दखल घेऊन भारतातील पवन ऊर्जा क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इंडियन विंड टर्बाइन मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशनच्या (खथढचअ) चेन्नई येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत गुरुवारी (दि. ३०) केंद्रीय नवीन व नवीकरणीय मंत्री मा. श्री. प्रल्हाद जोशी यांच्याहस्ते महावितरणला 'विंड इंडिया-२०२५' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात अपर मुख्य सचिव (ऊर्जा) सौ. आभा शुक्ला यांनी राज्याच्या वीज क्षेत्रासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. या नियोजनाद्वारे प्रामुख्याने सौर ऊर्जेसह पवन-सौर हायब्रिड, पवन, बगॅस, बायोमास व लघु जलविद्युत अशा विविध अक्षय स्रोतांपासून वीज निर्मितीला प्रोत्साहन मिळाले आहे. तर अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने प्राधान्य दरांवर दीर्घकालीन वीज खरेदी करार (पीपीए) केले आहेत. यात ४ हजार ३४४ मेगावॅट पवन-सौर संकरीत विजेसाठी दीर्घकालीन खरेदी करार करण्यात आले आहेत.

चेन्नई ट्रेड सेंटरमध्ये आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत गुरुवारी (दि. ३०) केंद्रीय नवीन व नवीकरणीय मंत्री मा. श्री. प्रल्हाद जोशी यांच्याहस्ते महावितरणला 'विंड इंडिया-२०२५' पुरस्काराने गौरविण्यात आले. महावितरणच्या वतीने मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी (नवीकरणीय ऊर्जा, मुंबई) यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी ऊर्जामंत्री श्री. एस. एस. शिवशंकर (तामिळनाडू) व के. जे. जॉर्ज (केरळ), केंद्रीय सचिव श्री. संतोषकुमार सारंगी व सहसचिव श्री. राजेश कुलहारी (नवीन व नवीकरणीय ऊर्जा), श्री. जोहान साथॉफ (संसदीय राज्य सचिव, जर्मनी), आयोजन समिती व असोसिएशनचे अध्यक्ष श्री. गिरीश तांती यांची उपस्थिती होती.

ऊर्जा विभागाच्या रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅननुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेची सह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. महाराष्ट्रातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यामध्ये सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. तसेच पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल व त्यायोगे सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहे.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्तालयात राष्ट्रीय एकता दिनाची शपथ

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** भारताचे पहिले उपपंतप्रधान, गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्तालयात आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार करून अभिवादन केले. तसेच दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना राष्ट्रीय संकल्प दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

भारतीय एकात्मतेसाठी निश्चियपूर्वक धोरण आखून त्यासाठी पावले उचलणाऱ्या सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येत असलेल्या राष्ट्रीय एकता दिनानिमित्त विभागीय आयुक्तालयातील अधिकारी, कर्मचारी यांना विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी राष्ट्रीय एकतेची शपथ दिली.

यावेळी उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे, नायब तहसीलदार श्याम देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त बिटरगाव पोलीस स्टेशन कडून दौड ऐकतेसाठी मॅरेथॉनचा आयोजन






दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** ३१ ऑक्टोबर हा दिवस सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त भारतात राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांनी नव्याने स्वतंत्र झालेल्या देशात राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या योगदानासाठी त्यांना ''भारताचे लोहपुरुष'' उपाधी मिळाली आहे.तसेच आधुनिक अखिल भारतीय सेवा प्रणाली स्थापन करण्यात त्यांच्या अग्रणी भूमिकेसाठी त्यांना ''भारताच्या नागरी सेवकांचे संरक्षक संत'' म्हणून देखील ओळखले जाते. ते केवळ भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री नव्हते तर भारताचे लोहपुरुष म्हणून त्यांनी आधुनिक भारताचा पाया रचणाऱ्या एकतेचे प्रतीक म्हणून काम केले.

आज त्यांच्या या जयंती निमित्त पहिल्यांदाच पोलीस स्टेशन बिटरगाव च्या वतीने ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या नेतृत्वात दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी गावात एकात्मा कायम ठेवण्यासाठी सरदार पटेल यांच्या जयंती निमित्त युनिटी मॅरेथॉनचे संविधान चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते ठाकरे चौक ढाणकी पर्यंत आयोजित करून सदर मॅरेथॉन मध्ये ढाणकीतील सर्व व्यापारी एसोसिएशन चे पदाधिकारी, शांतता समिती सदस्य, युवा मोहाला समिती सदस्य, पोलीस मीत्र सर्व राजकीय पदाधिकारी पत्रकार बांधव, प्रतिष्ठित नागरिक, योगा गुरुप यांना भाग घेण्यासाठी आमंत्रीत करून पूर्ण ढाणकीकर यांना संविधान चौक येथे एकत्रित करत या मॅरेथॉन मध्ये सहभाग घेऊन ऐकते साठी दौड घेतली. या मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्यांना पोलीस स्टेशन बिटरगाव ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्याकडून मेडल आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. ''रन ऑफ युनिटी ''या उपक्रमातून ढाणकी मध्ये राष्ट्रीय एकता दिनाचा संदेश आणि ''एक भारत, श्रेष्ठ भारत'' चा संदेश दिला.